
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय अठरावा , भाग चौथा

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

# भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

## अध्याय अठरावा : भाग चौथा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

# श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

# ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

**E** Sahity Pratishthan

**E**leventh floor(G1102)

**E**ternity

**E**astern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

©श्री विजय पांढरे(२०१२)

**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari

http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

जगी माझ्याविषयीचे अज्ञान । म्हणून भलतेच ते समजून । जाती लोक बा अडकून । इच्छांकारणे ॥१११४॥
अज्ञानाच्याकारणे । मज नामरुपी समजणे । मग मी तैसाच अनुभवा येणे । घडे अर्जुना ॥१११५॥
स्वप्नाचे असणे नसणे । जैसे आपलेच कारणे । तैसे विश्वाचे हे भासणे । माझे ठायी ॥१११६॥
ऐसा जो ब्रह्मभाव । तो माझा सहज स्वभाव । तयासीच भक्ती नाव । आहे बा अर्जुना ॥१११७॥
म्हणोनी आर्ताच्या ठायी । हे आर्त होऊनी पाही । अपेक्षणीय जे काही । ती माझीच कला ॥१११८॥
पुढे होऊनी ती जिज्ञासा । तो जिज्ञासू होई वीरेशा । मीच तो जिज्ञासू ऐसा । दाखविला अर्जुना ॥१११९॥
मग इच्छांच्या कारण । अर्जुना मीच अर्थी होऊन । माझीच भक्ती ती करणं । घडे येथे ॥११२०॥
ऐसे अज्ञानाकारणे । या तीन भक्तींचे वर्तणे । तेच द्रष्टा दृश्याचे भासणे । आहे अर्जुना ॥११२१॥
जसे आरशाचेकारणे । प्रतिबिंबाचे प्रकटणे । तैसे दृष्टा दृश्याचे भासणे । अज्ञानाकारणे ॥११२२॥
जसे डोळ्याचेकारणे । एक चंद्राचे दिसणे । पण दोन चंद्र भासणे । तो नेत्ररोग ॥११२३॥
तसा मीच बा सर्वत्र । अर्जुना आहे चिन्मात्र । पण दिसे द्वैताचे चित्र । अज्ञानाकारणे ॥११२४॥
ते अज्ञान आता फिटले । द्रष्टा-दृश्यत्व संपले । दर्शन बा प्रकटले । सर्वत्र अर्जुना ॥११२५॥
जेव्हाही सोन्यात भेसळ । तेव्हाही सोनेंचि अढळ । परि भेसळ गेलीया केवळ । उरे जैसे ॥११२६॥
का पौर्णिमेच्या आधी काही । चंद्र बा संपूर्ण नाही । पण पूर्णत्वाची ग्वाही । पौर्णिमाच की ॥११२७॥
अर्जुना मीच ज्ञान सर्वत्र । मजकारणेच भासती जीवमात्र । द्वैताची सरता रात्र । लाभ माझा ॥११२८॥
म्हणून द्वैताच्या अतीत । माझा भक्तियोग निश्चित । त्या चौथ्या भक्तीत । भेट माझी ॥११२९॥
या ज्ञानभक्ती सहज । जो भक्त एकवटला मज । मीच तो केवळ हे तुज । श्रुत आहे ॥११३०॥
ते उभारुनी भुजा । ज्ञानिया आत्मा माझा । हे बोलिलो कपिध्वजा । सप्तमाध्यायी ॥११३१॥
ती ही भक्ती मिया । शिकविली त्या ब्रह्मया । भागवतमिषे धनंजया । जाणतो तू ॥११३२॥
ज्ञानी इयेते स्वसंविती । शैव म्हणती शक्ती । आम्ही परमभक्ती । आपुली म्हणो ॥११३३॥
अर्जुना कर्मयोगाद्वारे । संपवून द्वैताचे वारे । अनुभवणे मीच विश्व सारे । कर्मयोग ॥११३४॥
तेथे वैराग्य विवेकेसी । आटे बंध मोक्षेसी । आणि वृत्ति आवृत्तीसी । बुडोनी जाये ॥११३५॥
घेऊनी असणेपणाते । नसणेपणही हारपे तेथे । गिळुनी ती चारी भुते । उरे आकाश ॥११३६॥
ऐसे अनुभवता अद्वैत । शुद्ध साध्यसाधनातीत । ते मीच होऊन एकवट । भोगती माते ॥११३७॥
गंगासिंधूचे मीलन । तैसेच अर्जुना हे ज्ञान । मजसी एकरुप होणं । भक्ती आहे ॥११३८॥
आरशासमोर आरसा ठेवता । दिसे आरशांत आरशांचा राबता । तैसे माझीच आहे सत्ता । नामरुपे ॥११३९॥
अर्जुना आरसा दूर करता । संपे प्रतिबिंबाचा राबता । आणि उरे अद्वैता सत्ता । सरता द्वैत ॥११४०॥
स्वप्नांतून ते जागता । उरे जागृतीचीच सत्ता । मग जागृतीत ती स्वप्नता । उरेचि ना ॥११४१॥
वस्तूशी एकरूप होणे । मग वस्तूचा न भोग घडणे । ऐसे अर्जुना जे म्हणणे । ते अज्ञान की ॥११४२॥
पाहण्या तो दिनकर । न लागे दिव्याचा आधार । तैसा ब्रह्ममयतेचा प्रकार । स्वसंवेद्य अर्जुना ॥११४३॥
राजाच्या पोटी न जन्मता । न मिळे ती राजमान्यता । तैसे ब्रह्ममय न होता । न कळे ब्रह्म ॥११४४॥
जसे आकाशच स्वत: होणं । तेच आकाशा जाणणं । तैसे ब्रह्ममय होऊन । जाणावे ब्रह्म ॥११४५॥
म्हणून जे मीच नाही झाले । मजसी तयांनी न जाणले । मग तयांनी मजला भजले । ते खोटेच की ॥११४६॥
यालागी तो कर्मयोगी । मीच होऊन मजसी भोगी । तारुण्य का तरुणांगी । जियापरी ॥११४७॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जसे त्या तरंगात । सर्वत्र पाणीच असतं । तैसे ब्रह्मचि असे वसत । सर्वत्र अर्जुना ॥११४८॥
तैसे रूप होऊन माझे । काही न होऊन भजे । अलंकार कां सहजे । सोन्याते जेवि ॥११४९॥
अर्जुना चंदनाचा वास । करी चंदनी रहिवास । जसा चंद्री चंद्रप्रकाश । वसे अर्जुना ॥११५०॥
तैसे नसूनही असणे । जे शब्दी न सांगता येणे । तिलाच मी भक्ती म्हणे । अद्वैत अर्जुना ॥११५१॥
तेव्हा पूर्वसंस्कार छंदे । तो जे काही अनुवादे । ते आळविलेने ओ दे । बोलता मीचि ॥११५२॥
बोलणाऱ्यास बोलता भेटे । तेथे बोलणे न घटे । ते मौन अर्जुना गोमटे । स्तवन माझे ॥११५३॥
तयाचे ते बोलणे । तेही माझेच कारणे । आणि तयाचे मज स्तवणे । मौन अर्जुना ॥११५४॥
ऐसी तयाचि दिठी । जे तो पाहू जाय किरीटी । ते ब्रह्मचि होऊनी लोटी । देखता क्षणी ॥११५५॥
जसे त्या आरशात । आपण असतो बा दिसत । तैसे सर्व त्या दृश्यात । तोचि असे ॥११५६॥
मग दृश्याचे भास जाऊन । द्रष्टापणही जाई संपून । मग केवळ ते दर्शन । उरे तेथे ॥११५७॥
जसे स्वप्नीचिया प्रिया । चेवोनी झोंबो गेलीया । स्वप्नाचे भास जाऊनिया । आपणचि उरे ॥११५८॥
जसे त्या अनेक लाकडात । अग्नी एकच असे वसत । तैसे सर्व विश्वात । ब्रह्मचि अर्जुना ॥११५९॥
घेऊ जाता प्रतिबिंब हातात । प्रतिबिंब नाहीसं होतं । तैसे द्वैत ते संपतं । प्रकटता अद्वैत ॥११६०॥
तैसे स्वयेचि ब्रह्म होता । संपते द्रष्ट्यासह दृश्यता । मग विश्वासी एकरुपता । अनुभवा येते ॥११६१॥
जैसे सूर्य तो उगवता । सर्वत्र प्रकाशाचीच सत्ता । तैसे विश्वी ब्रह्ममयता । आढळते अर्जुना ॥११६२॥
मग देखिजे वा न देखिजे । ऐसी जी दशा निपजे । तेच दर्शन बा माझे । साचोकारे ॥११६३॥
ऐसे होता बा ज्ञान । द्रष्टादृश्य जाती संपून । आणि उरे ब्रह्मपण । सर्वत्र अर्जुना ॥११६४॥
आकाश जे आकाशात । दाटून असे राहत । तैसे ब्रह्मचि विश्वात । ठासले अर्जुना ॥११६५॥
जसे त्या प्रलयात । सर्वत्र पाणीच एक असतं । तैसे ब्रह्मच असे वसत । सर्वत्र अर्जुना ॥११६६॥
पायाने पायास सोडणे । अग्नीने स्वत:स जाळणे । पाण्याने पाण्यास स्नान करणे । घडे का कधी ॥११६७॥
म्हणून सर्वत्र मी झाल्याने । थांबते ते जन्मणे मरणे । तेचि गा यात्रा करणे । अद्वैताची ॥११६८॥
जसा पाण्यावरील तरंग । कितीही घेतला त्याने वेग । तरी कधी का भूमीभाग । क्रमिला तेणे ॥११६९॥
जे सांडावे का मांडावे । जे चालणे जेणे चालावे । ते पाणीच एक आघवे । म्हणोनिया ॥११७०॥
गेलीयाही कदाचिता । उदकपणे पांडुसुता । तरंगाची ती एकात्मता । मोडली का कधी ॥११७१॥
तैसा जो जागला । स्वयेचि तो विश्व झाला । तोच अर्जुना यात्री भला । कापडी माझा ॥११७२॥
आणि शरीरस्वभाववशे । काही एक करू बसे । तरी मीचि तो तेणे मिषे । भेटे तया ॥११७३॥
तेथ कर्म आणि कर्ता । हे जाऊनी पांडुसुता । स्वत:च ब्रह्म होणे तत्त्वत: । सूत्र आहे ॥११७४॥
अविद्येच्याकारणे । ब्रह्माने संकुचित होणे । तेच कर्त्याचे भासणे । आहे बा अर्जुना ॥११७५॥
कर्त्याच्या भासाकारण । तेथे कर्माचं प्रकटन । पण ते ब्रह्माचं करणं । नाही बा अर्जुना ॥११७६॥
कर्म जे होत आहे । ते करावे हे भाष जाये । ते न करणेचि होय । तयाचे केले ॥११७७॥
अवघी क्रियाजात मी झाल्याने । घडे काहीच न करणे । तयासीच नाव पूजणे । अर्जुना माझ्या ॥११७८॥
पहा कैसी ही मजा । येथे न करणेच पूजा । गंमत ही कपिध्वजा । जाणावीस तू ॥११७९॥
एवं तो बोले ते स्तवन । तो देखे ते दर्शन । अद्वैत ते गमन । चालणे त्याचे ॥११८०॥
तो करी तेतुली पूजा । तो कल्पी तो जपू माझा । असणे त्याचे कपिध्वजा । समाधी माझी ॥११८१॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अलंकार आणि सोने । तैसा तो मजसी अनन्यपणे । तयासीच मी भक्त म्हणे । अर्जुना माझ्या ॥११८२॥
लाटा त्या पाण्यात । सुवास जसा कापुरात । वा तेज ते रत्नात । तैसे अर्जुना ॥११८३॥
ते तंतू आणि पट । मृत्तिका आणि घट । तैसा तो एकवट । मजसी अर्जुना ॥११८४॥
ऐसे ब्रह्मी एकरूप होऊन । तो विश्वच जातसे बनून । मग तो आणि विश्व भिन्न । नाहीच बा अर्जुना ॥११८५॥
सुषुप्ति स्वप्न जागृतीद्वारे । दृश्याचे ते प्रकटते वारे । मग दृश्याठायीच स्फुरे । द्रष्टा अर्जुना ॥११८६॥
अवघे दृश्य आणि द्रष्टा । ते ब्रह्मचि बा सुभटा । पाण्याच्या त्या लाटा । पाणीच जैसे ॥११८७॥
अर्जुना जसा अंधारात दोर । भासे सापाचाच प्रकार । तैसे विश्व होई गोचर । ब्रह्माचे ठायी ॥११८८॥
अर्जुना आकळता दोर । नाही सापाचा वावर । तैसे विरती बा चराचर । आकळता ब्रह्म ॥११८९॥
सोनेच होते अलंकार । नाही दोन्ही भिन्न गुंजभर । तैसे ब्रह्म आणि चराचर । एक अर्जुना ॥११९०॥
जैसे स्वप्न ते संपता । आणि जाग ती येता । आपलीच ती सत्ता । उमजते आपणा ॥११९१॥
तैसे दृश्याच्या कारण । येथे द्रष्ट्याचं भासणं । आणि दोघेही ब्रह्माच्याच कारण । अर्जुना माझ्या ॥११९२॥
जाणे अजरू मी अमरू । अक्षयो मी अक्षरु । अपूर्वु मी अपारू । आनंदू मी ॥११९३॥
अचळ मी अच्युत । अनंत मी अद्वैत । आद्यु मी अव्यक्त । व्यक्तही मी ॥११९४॥
ईश मी ईश्वर । अनादि मी अजर । अभय मी आधार । आधार माझा ॥११९५॥
स्वामी मी सदोदित । सहजु मी सतत । सर्व मी सर्वगत । सर्वातीत मी ॥११९६॥
नवा मी पुराणु । शून्य मी संपूर्णु । स्थूल आणि अणू । मीच बा अर्जुना ॥११९७॥
अक्रिय मी येक । असंग मी अशोक । व्याप्य मी व्यापक । सर्वकाही ॥११९८॥
अशब्द मी अक्षोत्र । अरुपी मी अगोत्र । सम मी स्वतंत्र । ब्रह्म मी ॥११९९॥
ऐसे आत्मतत्त्वे एकाते । जाणोनी अद्वयभक्ती निरुते । आणि या सर्वा जे जाणते । ते तत्त्व मी ॥१२००॥
जसे जाग ती येणं । आणि उरे आपलेच एकलेपण । तैसे आपणच ब्रह्म होऊन । जाणावे जगा ॥१२०१॥
जसे सूर्याच्या कारण । प्रकाश तो होणं । पण सूर्य नि प्रकाश भिन्न । नसतीच कधी ॥१२०२॥
द्वैताचा अंत होता । संपे ज्ञेय आणि ज्ञाता । आणि उरे ती ब्रह्ममयता । एकरस ॥१२०३॥
आपले ते अद्वैतपण । जयाने अर्जुना जाणणं । ती जाणीव म्हणजेच ज्ञान । उमजते अंतरी ॥१२०४॥
मग द्वैत अद्वैतातीत । मीच आत्मतत्त्व निभ्रांत । सर्वांना जे जाणतं । ते ब्रह्म मी ॥१२०५॥
ऐसे अनुभवून अनंतपण । ब्रह्मही जातसे विरून । मग काही न होणं । उरे तेथे ॥१२०६॥
जयासी बा सोन्याची जाण । तया अलंकारी सोनेच दिसणं । अलंकारी ते अडकणं । नाही तेथे ॥१२०७॥
मिठाचे ते पाणी होता । पाण्यात राहते खारटता । नंतर खारटताही संपता । नुरे मीठ ॥१२०८॥
तैसे ब्रह्ममयतेचे भान । अर्जुना तेही जाते विरून । मग कोणीच न होऊन । राहणं घडे ॥१२०९॥
ऐसा असणेपणाचा अंत । तो मीच अर्जुना भगवंत । ऐसे राहणे स्वस्वरूपात । मोक्ष आहे ॥१२१०॥
कापूर जळून जाता । ज्वालांची होते सांगता । मग उरे केवळ आकाशता । तैसे अर्जुना ॥१२११॥
ऐसी ब्रह्ममयता विरणे । तेच अर्जुना शून्य होणे । मग आहे नाहीची संपणे । भाषा तेथे ॥१२१२॥
ब्रह्म आत्मा ईश्वरीय । तेथे असणे नसणेपणा जाय । नाही म्हणण्याचीही सोय । नाही तेथे ॥१२१३॥
न बोलणेही न बोलोनी । बोलिजे तोंड भरुनी । जाणीव नेणीव नेणोनी । जाणिजे ते ॥१२१४॥
तेथे बुझे बोध बोधे । आनंदू घेपे आनंदे । सुखवरी नुसधे । सुखचि भोगिजे ॥१२१५॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तेथे लाभू जोडला लाभा । प्रभा आलिंगली प्रभा । विस्मयो बुडाला उभा । विस्मयामाजी ॥१२१६॥
शमू तेथे शमला । विश्रामू विश्रांती आला । अनुभवू वेडावला । अनुभुतीपणे ॥१२१७॥
किंबहुना ऐसे निखळ । जोडे तया फळ । वेली कर्मयोग वेल्हाळ । फळा आली ॥१२१८॥
पै योगाचिये किरीटी । चक्रवर्तीच्या मुकुटी । सुषुप्तीच्या शेवटी । ज्ञान होई ॥१२१९॥
हा कर्मप्रसाद खास । मोक्षाचा जो कळस । स्वत: होणे अवकाश । मोक्ष आहे ॥१२२०॥
या संसार रानात । कर्मयोग एक वाट । येते मज ऐक्या नीट । अर्जुना ती ॥१२२१॥
कर्मयोग आचरणे । तुर्येसी एकरूप होणे । तेचि मोक्षासी पावणे । आहे बा अर्जुना ॥१२२२॥
हाच अर्जुना सुवर्मा । कर्मयोगी आहे महिमा । म्हणोनी वेळोवेळी तुम्हा । सांगतो आम्ही ॥१२२३॥
तसा मी आधीपासून । मज पावण्या न लगे साधन । ओलांडणे सुषुप्ति जागृती स्वप्न । सूत्र आहे ॥१२२४॥
म्हणोनी माझेठायी । साधना न लगेचि काही । मन ज्याचे निष्काम होई । तो पावला मज ॥१२२५॥
एक शिष्य एक गुरू । हा बोलाचाच व्यवहारू । तो मज प्राप्तीचा प्रकारू । जाणावया ॥१२२६॥
हिरे पृथ्वीच्या पोटात । अग्नी लाकडाच्या आत । दूध गाईच्या सडात । आधीच आहे ॥१२२७॥
अर्जुना जे लाभतं । ते आधीच बा असतं । होणे द्वैताचा तो अंत । अद्वैत आहे ॥१२२८॥
या कर्मयोगाबाबत । देव असे बा बोलत । आहे बा तो समजावत । सूत्र आम्हा ॥१२२९॥
समजता गीतार्थाची महती । भेटे मोक्षाची ती गती । अन्य उपाय नसती । प्रमाणसिद्ध ॥१२३०॥
वारा करे ढगा दूर । तो कैसा निर्मिल प्रभाकर । शेवाळ होता ते दूर । उरे पाणी ॥१२३१॥
तैसे आत्मतत्त्वावर । असे अविद्येचा पदर । तो शास्त्राद्वारे होता दूर । प्रकटे तत्त्व ॥१२३२॥
म्हणोनी अवघेचि शास्त्र । ती अविद्या नाशाची सूत्र । ती नसती बा स्वतंत्र । आत्मबोधा ॥१२३३॥
सर्व शास्त्रात महान । अर्जुना गीतेचे बा ज्ञान । सत्यासी बा प्रमाण । गीता आहे ॥१२३४॥
सूर्य पूर्वेला उगवी । अन् सर्वत्र प्रकाशच होई । तैसी गीता मोक्षदायी । सर्वाला अर्जुना ॥१२३५॥
गीता ती आकळणं । तेचि निष्काम बा होणं । मग आत्मतत्त्वाचं प्रकटणं । अनिवार्य आहे ॥१२३६॥
पण प्रथम श्रवणे । अर्जुना गीता न कळणे । हे जाणून भगवंताने । सांगितले पुन्हा ॥१२३७॥
होण्या अर्जुना ज्ञान । पुन्हा बोलले भगवान । तोच प्रसिद्ध म्हणून । अध्याय अठरा ॥१२३८॥
गीता समाप्तीच्या क्षणी । केली सूत्रांची उजळणी । ज्ञानबीजांची पेरणी । पुन्हा एकदा ॥१२३९॥
अर्जुनाने या ग्रंथात । केले नाना प्रश्न उपस्थित । म्हणून सांगे बा भगवंत । सूत्र पुन्हा ॥१२४०॥
सर्वच सिद्धांन्त । असती अर्जुना गीतेत । म्हणून सार असे सांगत । भगवंत पुन्हा ॥१२४१॥
अर्जुना या गीतेत । निष्कामताच असे वसत । म्हणून आरंभ नि अंत । एकचि केला ॥१२४२॥
होता निष्काम ते मन । जाई अविद्या संपून । अर्जुना हेचि बा ज्ञान । गीतेमाजी ॥१२४३॥
हे एवढेच ज्ञान । सांगितलं भगवंतानं । होणे निष्काम मन । सूत्र आहे ॥१२४४॥
होण्या सूत्राची उजळणी । केली अठराव्याची मांडणी । ऐसे पुन्हा त्या भगवंतानी । सांगितले ज्ञान ॥१२४५॥
ऐसे बा साधकानं । कर्मयोग आचरून । मजसी एकरूप होणं । सूत्र आहे ॥१२४६॥
स्वकर्माच्या त्या पाऊली । माझी पूजा करणे भली । तया प्रसादे आकळली । ज्ञाननिष्ठा ॥१२४७॥
ती ज्ञाननिष्ठा जेथे वसे । तेथे भक्ती माझी उल्लासे । तया भजन समरसे । सुख होय ॥१२४८॥
अर्जुना असे हे करता । प्रकटते बा ब्रह्ममयता । ऐसी माझीया भक्ता । भेट माझी ॥१२४९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

टाकून आपले मीठपण । मिठानं पाणीच बा होणं । जसं वायूनं ते राहणं । आकाशी अर्जुना ॥१२५०॥
तैसा बुद्धी वाचा काये । जो मजसी आश्रवूनी ठाये । घडता निषिद्ध कर्म विपाये । दोष नाही ॥१२५१॥
जसा प्रवेशता गंगेत । नालाही पवित्र असे होत । तैसे मजसी बा पावत । पवित्र सारे ॥१२५२॥
फरक लाकूड आणि चंदनात । जोवरी अग्नी नाही धरत । टाकता त्या अग्नीत । अग्नीच दोन्ही ॥१२५३॥
फरक शुद्ध अशुद्धतेचा । सोने आणि लोहाचा । जोवरी स्पर्श परीसाचा । जाहला नाही ॥१२५४॥
तैसे शुभाशुभ ऐसे । हे तवंवरीच हे आभासे । जोवरी न प्रकाशे । अंतरी ब्रह्म ॥१२५५॥
जसे सूर्याच्या ठायी । दिवसरात्र नाही । तैसे ब्रह्म ते पाही । द्वैतातीत ॥१२५६॥
तैसी माझी भेट होता । सर्व कर्मे पावती ब्रह्मता । ऐसी तो सायुज्यता । मेळवी अर्जुना ॥१२५७॥
देश काल स्वभाव । यांचा नाही जेथे उद्भव । तो प्रकटे बा ब्रह्मभाव । अंतरी त्याच्या ॥१२५८॥
जेथे पहा पांडुसुता । घडे मजसी एकरूपता । तेथे सुखाची कमतरता । नाहीच कधी ॥१२५९॥
हे सर्व तू जाणून । कर कर्मे मजसी अर्पण । मग माझे तुझे एकपण । अनादिच की ॥१२६०॥
मजसी एक होणं । तोच संन्यास जाण । करता मनाने मनाचे निरीक्षण । भेट माझी ॥१२६१॥
विवेकाच्या कारण । निष्काम होणे मन । मग सर्व कर्म निरसून । मीच होसी ॥१२६२॥
ऐसा विवेकाच्या बळे । होऊनी कर्मा वेगळे । माझे स्वरूप ते आगळे । देखशील ॥१२६३॥
आणि कर्माची जननी । ती प्रकृती भिन्न माझ्याहूनी । अर्जुना ते बा जाणुनी । मुक्त होसी ॥१२६४॥
ऐसा प्रकृतिनाश होणं । तोच कर्मसंन्यास जाण । तिलाच नैष्कर्म्यता म्हणणं । अर्जुना मी ॥१२६५॥
कर्म समूळ मावळता । प्रकटते ती ब्रह्ममयता । मजसी एकरूप होता । ब्रह्म उरे ॥१२६६॥
ऐसा अनन्य बुद्धियोग । अर्जुना तोच ब्रह्मभोग । घडणे चित्ताचा त्याग । मोक्षदायी ॥१२६७॥
ऐसे चित्त ज्यांनी सांडले । ते मजठायी एक झाले । मग मीचि होऊनी राहिले । अर्जुना ते ॥१२६८॥
ऐशा या रीतीनं । मजसी एक होणं । तोच प्रसाद जाणं । अर्जुना माझा ॥१२६९॥
असे झाले असता । संपते अर्जुना दु:खता । आणि जीवभावाची कथा । सुख होय ॥१२७०॥
सूर्य तो उगवता । संपते ती अंधारता । तैसे ज्ञान ते होता । संपे दु:ख ॥१२७१॥
ऐसा प्रसाद लाभता । संपते जिवाची पृथकता । मग ती ब्रह्ममयता । उरे येथे ॥१२७२॥
माझ्या त्या प्रसादानं । घडे भवचक्रातून सुटणं । अन्यथा बा कठीण । भवचक्र हे ॥१२७३॥
माझी ही वचनं । नकोस देऊ तू टाकून । अन्यथा येथून सुटणं । अशक्य आहे ॥१२७४॥
नित्यमुक्त तू अर्जुना । अन्यथा अडकशील बंधना । मग भवचक्राचा घाणा । चालूच राहे ॥१२७५॥
राहता या देहमनात । आहे प्रतिक्षणी आत्मघात । अडकणे बा तयात । दु:ख आहे ॥१२७६॥
विश्वास तू जर । न ठेवला मजवर । मग दु:खाचा डोंगर । चुकेचि ना ॥१२७७॥
पथ्यद्वेषिया पोषे ज्वर । का दीपद्वेषिया अंध:कार । तैसा विवेकद्वेषे अहंकार । पोषुनी राहे ॥१२७८॥
स्वदेहा नाम अर्जुन । परदेहा नाम स्वजन । संग्रामा नाम मलिन । पापाचार ॥१२७९॥
ऐसे आपल्या मतीनं । तिघा तीन नामे देणं । आणि युद्ध न करणं । चूक आहे ॥१२८०॥
क्षत्रिय तू जन्माने । तुला आवडे झुंजणे । म्हणून युद्ध ते करणे । होईल येथे ॥१२८१॥
मी हा अर्जुन । कैसे स्वजना मारीन । सगळं हे बोलणं । मायाचि की ॥१२८२॥
आधी झालास तयार । हाती घेऊन हत्यार । आता पळण्याचा प्रकार । शोभतो का ॥१२८३॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

म्हणून न झुंजणे । ते वायाचि बा बोलणे । तू युद्ध ते करणे । अनिवार्य की ॥१२८४॥
तुझा जरी तो निर्धार । मी युद्ध न करणार । पण तुझे ते संस्कार । लढवतील तुज ॥१२८५॥
पाणी पूर्वेकडे वाहणं । पोहणाऱ्याने पश्चिमे जाणं । मग पोहणाऱ्याची धूळधाण । नक्कीच की ॥१२८६॥
साळीचा कण म्हणे । मी न उगवे साळीपणे । पण स्वभावा उल्लंघणे । अशक्य की ॥१२८७॥
स्वभाव तुझा झुंजणे । आता जरी नाही म्हणे । पण झुंजशील शूरपणे । संस्कारास्तव ॥१२८८॥
शौर्य तेज दक्षता । गुण तुजठायी जन्मत: । म्हणून युद्ध कर आता । निधडेपणे ॥१२८९॥
त्या संस्काराप्रमाणे । बाध्य तुला झुंजणे । तुला युद्ध टाळणे । शक्य नाही ॥१२९०॥
अर्जुना तू त्रिगुणी । अडकलास बा बंधनी । म्हणून लढशील रणी । त्रिगुणाकारणे ॥१२९१॥
पाहता तुझे जन्मकुळ । न झुंजणे हे खूळ । येता युद्धाची वेळ । झुंजशील रणी ॥१२९२॥
बांधोनी ते हातपाय । जो रथी घातला होय । तो न चाले तरी जाय । दूर जेवि ॥१२९३॥
ऐसा तू जरी म्हणाला । मी उभा न राही युद्धाला । पण भिडशील तू शत्रूला । खात्री माझी ॥१२९४॥
जेव्हा तो पुत्र विराट । होता रणाबाहेर जात । तेव्हा अडवून खेचले युद्धात । तयासी तू ॥१२९५॥
महावीर अकरा अक्षौहिणी । तुवा एके नागविले रणांगणी । तो स्वभाव कोदंडपाणि । झुंजवील तुते ॥१२९६॥
रोग न आवडे रोग्याला । दारिद्र्य न आवडे दारिद्र्याला । पण उपाय त्या त्रिगुणाला । नाहीच की ॥१२९७॥
त्या त्रिगुणाच्याकारण । अनिवार्य तुला युद्ध करणं । आता युद्ध ते टळणं । शक्य नाही ॥१२९८॥
सर्व त्या भूतांत । चित्तवृत्ती असती राहत । खरं तर ब्रह्मच बा बनतं । चित्तवृत्ती ॥१२९९॥
अर्जुना त्या चित्तवृतींनी । निर्मिल्या अवस्था तिन्ही । म्हणून सुषुप्ति जागृती स्वप्नी । अडकले सर्व ॥१३००॥
द्रष्टा दृश्याच्या सरोवरात । विषयरुपी कमळे उगवतात । आणि इंद्रियांना भुलवतात । जिवाच्या अर्जुना ॥१३०१॥
अर्जुना तो ईश्वर । विश्वाचा घेऊन आकार । अहंभाव पांघरून निरंतर । प्रकटतो येथे ॥१३०२॥
मायेच्या त्या कारण । जीवभाव तो जागून । चराचराचे प्रकटन । घडे येथे ॥१३०३॥
ब्रह्मापासून किड्यापर्यंत । येथे प्राणी जन्मतात । कर्माप्रमाणे असे भेटत । देह येथे ॥१३०४॥
अर्जुना आपल्या कर्मानुसार । भेटे देहाचा प्रकार । मग भासे बा अहंकार । देहा ठायी ॥१३०५॥
सुताचे वस्त्र गुंफले । की सोनेच अलंकार झाले । तैसे ब्रह्मच बा प्रकटले । होऊनी विश्व ॥१३०६॥
अडकून त्या देहात । प्राणी दुसऱ्यांना असे पाहत । मग अडकणे द्वैतात । घडे येथे ॥१३०७॥
ऐसेनि शरीराकारी । ब्रह्मचि भुते अवधारी । ऐसी कर्माची शिदोरी । वाढे अर्जुना ॥१३०८॥
त्या कर्माच्याकारण । होते जीवभावाचे प्रकटन । मग वासना त्या वाढून । वाढते कर्म ॥१३०९॥
ऐसे इच्छांच्याकारण । स्वर्ग संसारात अडकून । फिरती बा सर्वजण । भवचक्री अर्जुना ॥१३१०॥
चुंबकाच्या कारण । घडे लोहा आकर्षण । तसे ब्रह्माच्याकारण । चाले विश्व ॥१३११॥
जसे चंद्राच्या कारण । समुद्रास भरती येणं । तैसे विश्वाचे संचालन । ब्रह्माकारणे ॥१३१२॥
समुद्रा भरती येणे । सोमकांता पाझर फुटणे । चकोर तो आनंदने । चंद्राकारण जैसा ॥१३१३॥
एकाच त्या ब्रह्माकारण । सर्व भुतांचे प्रकटन । तुझ्याही अंतरी ते नांदणं । ब्रह्माचं अर्जुना ॥१३१४॥
आपल्या असणेपणाचा भास । तेचि परिच्छिन्न ब्रह्म खास । जाणणे तयाच्या अनंत स्वरूपास । सूत्र आहे ॥१३१५॥
त्या ब्रह्माच्याच कारण । येथे सर्वकाही घडणं । पहा तुला ते लढवीन । न लढसी जरी ॥१३१६॥
त्या ब्रह्माच्याच अधीन । अर्जुना या प्रकृतीचं असणं । तयानेच बा चालवणं । इंद्रिये सारी ॥१३१७॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

करणं वा न करणं । दोन्ही ते टाकून । जा बा तू शरण । हृदयस्था ॥१३१८॥
देऊनी काया वाचा मन । जा अर्जुना तया शरण । जसं गंगेनं शिरणं । महासागरी ॥१३१९॥
मग तयाच्या प्रसादानं । होईल शांतीचं प्रकटन । स्वरूपी मग रममाण । होशील तू ॥१३२०॥
जेथून विश्व प्रकटते । विश्रांती जेथे विसावते । आणि अनुभवा ती लाभते । अनुभूती अर्जुना ॥१३२१॥
त्या आत्मपदी बसून । जा अमर तू होऊन । असं त्या भगवंतानं । म्हटलं तया ॥१३२२॥
हा गीता ग्रंथ विख्यात । सर्व शास्त्रांचे मथित । आत्मतत्त्व तेणे हस्तगत । होते अर्जुना ॥१३२३॥
ज्ञान जे ब्रह्म म्हणून । वेदांती प्रसिद्ध असणं । तेच भरले बा ठासून । गीतेमाजी ॥१३२४॥
विश्वाचे ते प्रकटन । आणि तयाचे संचालन । ते सर्व बा होणं । ब्रह्माकारणे ॥१३२५॥
अर्जुना हे आत्मज्ञान । भक्त योग्यांचे धन । ते बा तुझ्यापासून । लपवू कसे ॥१३२६॥
याकारणे बा पांडवा । मी माझा गुह्य ठेवा । दिधला बा तुवा । मुक्तपणे ॥१३२७॥
जसे त्या मातेने । पुत्रासी मोकळे बोलणे । तैसेच माझे उपदेशणे । आहे तुला ॥१३२८॥
जैसे आकाशा गाळीजे । अमृताची साल फेडीजे । का दिव्याकरवी करविजे । दिव्य जेवि ॥१३२९॥
जयाचेनि अंगप्रकाशे । पाताळीचा परमाणू दिसे । त्या सूर्या घालणे जैसे । अंजन अर्जुना ॥१३३०॥
तैसे मी सर्वज्ञानं । सर्व बाजूनं विचार करून । ते सत्य ब्रह्मज्ञान । सांगितले तुवा ॥१३३१॥
आता या उपरी । योग्य ते तू निर्धारी । आणि निर्धारुनी करी । आवडे तैसे ॥१३३२॥
या देवाचिया बोला । अर्जुन उगाचि राहिला । तेथ देवो म्हणती भला । कैसा तू अर्जुना ॥१३३३॥
जर त्या जेवणाऱ्यानं । संकोचून नाकारलं अन्न । तया भूक ती सहन । करावी लागे ॥१३३४॥
तैसे सर्वज्ञ गुरू भेटणे । आणि आत्महित न पुसणे । ते स्वत:सीच फसवणे । नाही का अर्जुना ॥१३३५॥
ऐसी आत्मवंचना करणे । ते पापाचे धनी होणे । आणि संधी ती घालवणे । कल्याणाची ॥१३३६॥
पाहुनी तुझे उगेपण । म्हणते अर्जुना माझे मन । एकवेळ पुन्हा ज्ञान । सांगावे मी ॥१३३७॥
तेथ पार्थ म्हणे दातारा । तू जाणतोस मज अंतरा । नाहीच कोणी दुसरा । तुज जैसा ॥१३३८॥
ज्ञेय हे जे आघवे । तू ज्ञाता एकचि स्वभावे । सूर्याचे कैसे नाकारावे । अस्तित्व देवा ॥१३३९॥
काय म्हटले अर्जुनाने । जाणले त्या भगवंताने । म्हणून पुन्हा सारांशाने । समजावले सारे ॥१३४०॥
अर्जुना अजून एकवेळ । करून अवधान अचळ । वचन माझे निर्मळ । ऐकावे पुन्हा ॥१३४१॥
हा विषय नव्हे बोलण्याचा । वा नसे हा ऐकण्याचा । समय तुझ्या भाग्याचा । उगवला आहे ॥१३४२॥
कासवीच्या दृष्टीची नवलाई । पिलांसाठी जी जीवनदायी । तैसेच अवधानाठायी । मोक्ष आहे ॥१३४३॥
केवळ अवधान ठेवता । होते मोक्षाची प्राप्तता । असता दैवाची अनुकूलता । घडे सारे ॥१३४४॥
द्वैत ते संपणे । अद्वैत बा अनुभवणे । ते अवधानाच्याच कारणे । अर्जुना माझ्या ॥१३४५॥
निष्काम होता मन । जयाचे होते प्रकटन । तोच आत्मा जाण । प्रियतमा तू ॥१३४६॥
आरशात जे दिसते । ते कधी का दुजे असते । आपलेच प्रतिबिंब असते । आरशाठायी ॥१३४७॥
तुझे निमित्त करत । माझ्यासाठीच असे बोलत । फरक माझ्या तुझ्यात । नाहीच काही ॥१३४८॥
म्हणून अंतरीचे गुज । सांगतसे जिवासी तुज । आहे ब्रह्ममयतेचे मज । व्यसन अर्जुना ॥१३४९॥
मीठ पाण्यात टाकता । पाणीच बने ते तत्त्वत: । तैसी ब्रह्मासी एकरुपता । व्हावी अर्जुना ॥१३५०॥
अर्जुना तुझे ठायी । मी सबाहय शुद्धता पाही । म्हणून ब्रह्ममयतेची नवलाई । सांगतो तुजला ॥१३५१॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

खरे सूत्र जे धर्माचे । आणि रहस्य अध्यात्माचे । ते ऐक बा साचे । अर्जुना पुन्हा ॥१३५२॥
तरी बाह्य आणि अंतरा । आपुलीया सर्व व्यापारा । मज व्यापकाते वीरा । विषयो करी ॥१३५३॥
वायू असे तो रहात । अर्जुना जसा आकाशात । तैसे होणे ब्रह्मासी एकवट । भक्ती आहे ॥१३५४॥
केवळ ब्रह्माचेच चिंतन । करो अर्जुना तुझे मन । आणि ब्रह्ममयतेचेच श्रवण । घडो तुला ॥१३५५॥
आत्मज्ञाने चोखडी । संत जी माझी रुपडी । तयांची ती आवडी । असो बा तुला ॥१३५६॥
सर्व विश्वाचे सार । ब्रह्म अर्जुना मी अपार । माझीया नामाचा व्यवहार । समजो तुला ॥१३५७॥
हाताचे ते करणे । का पायाचे चालणे । येथे सर्व काही घडणे । माझेचि ठायी ॥१३५८॥
आपले आणि परके जन । ऐसा भेद तो टाकून । सर्वांवर प्रेम करणं । घडो येथे ॥१३५९॥
अर्जुना ही मती । शिकवू तुला किती । सर्व प्राणी जे दिसती । ते सर्व मीच ॥१३६०॥
मलाच सर्वत्र जाणता । संपे द्वेषाचा राबता । मग मजसी एकरुपता । लाभेल तुज ॥१३६१॥
मग या विश्वात । संपून ते द्वैत । तू माझ्याच स्वरूपात । पाहशील तुजला ॥१३६२॥
अनुभवता ती अवस्था । जी तुझी माझी एकता । अर्जुना ती ब्रह्ममयता । आहे सुख ॥१३६३॥
अर्जुना ते द्वैत मन । तीच होती बा अडचण । निष्काम होता मन । भेट आपली ॥१३६४॥
जैसे तळ्यातील पाणी आटता । स्वयेचि उरे बिंब सर्वथा । तैसी ती ब्रह्ममयता । उरे मग ॥१३६५॥
जसा वायू जिरे आकाशात । वा तरंग विरे पाण्यात । तया अडवण्याची ताकद । आहे का कोणा ॥१३६६॥
तैसा तू आणि मी । जरी भासे देहधर्मी । पण देहाच्या विरामी । मीचि होसी ॥१३६७॥
माझ्या या वचना । शंका न घेई अर्जुना । तुला आहे पुन्हा पुन्हा । शपथ माझी ॥१३६८॥
अर्जुना हे शपथ घालणे । ते प्रीतीच्याच कारणे । प्रीतीच्या त्या ठिकाणे । लाज कैसी ॥१३६९॥
एऱ्हवी निर्गुण म्हणून । जयाचे उपनिषदे करती वर्णन । ते ब्रह्म बा जाणणं । मुक्ती आहे ॥१३७०॥
मी ब्रह्म सत्यसंकल्प । आणि विश्वाचा बाप । मग शपथेचा खटाटोप । कशाला अर्जुना ॥१३७१॥
अर्जुना तुझ्या प्रेमाकारण । मी सोडले ते देवपण । तुझ्याशी एकरूप होणं । आवडे मला ॥१३७२॥
आपल्याच स्वार्थाकारणे । आपणच आपली शपथ घेणे । तैसेच हे म्हणणे । आहे बा अर्जुना ॥१३७३॥
मग अर्जुन तो म्हणाला । देवा भलतेच तुम्ही बोलला । हा विश्व कारभार चालला । तुझेचि कारणे ॥१३७४॥
उपदेश तू करसी । वर शपथही घालसी । देवा या विनोदासी । म्हणावे काय ॥१३७५॥
विश्वा जया प्रकाशणे । तयाने एक कमळ उमलवणे । त्यात नवल काय असणे । भगवंता माझ्या ॥१३७६॥
देवा समुद्रही भरतो । इतका जलवर्षाव मेघ करतो । तो चातकाची तृष्णा भागवतो । नवल काय ॥१३७७॥
देवा सर्वज्ञ तू सकळ । आणि दाताही सबळ । निमित्त मी केवळ । म्हणणे माझे ॥१३७८॥
तेव्हा देव तो म्हणाला । हा विषय पुरे झाला । पावशी मम स्वरूपाला । आकळता ब्रह्म ॥१३७९॥
समुद्रात मीठ पडता । प्रकटते मीठ पाण्याची ऐक्यता । तैसी ती ब्रह्ममयता । स्वरूप माझे ॥१३८०॥
निष्काम ते होऊन । अर्जुना कर्म करणं । मग ब्रह्ममयतेचे प्रकटन । अंतरी होते ॥१३८१॥
ऐसे कर्मयोगाकारण । कैसी माझी प्राप्ती होणं । हे सर्व समजावून । सांगितले तुला ॥१३८२॥
ऐसे बा पांडुसुता । सर्व कर्मे मज अर्पिता । सर्वत्र ब्रह्ममयता । अनुभवा येते ॥१३८३॥
ऐसे करून निष्काम मन । अर्जुना गुणातीत होणं । मग स्वप्न सुषुप्ति ओलांडणं । सूत्र आहे ॥१३८४॥
मग पार्था त्याचेठायी । साध्यसाधन उरत नाही । किंबहुना तयाचे कर्म काही । उरेचिना ॥१३८५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अर्जुना सर्व कर्मे आपुली । तुवा सर्वदा मज अर्पिली । म्हणून आज ही लाभली । वचने तुला ॥१३८६॥
येऊनी तुजविषयी कळवळा । न पाहता युद्धाचा अडथळा । उपदेश भलत्यावेळा । केला तुज ॥१३८७॥
ज्याकारणे संपणे ते अज्ञान । आणि ब्रह्ममयतेचे होणे प्रकटन । ती आत्मज्ञानाची खाण । गीता अर्जुना ॥१३८८॥
सत्यज्ञान जे आपुले । नानापरी मी उपदेशिले । निष्काम करुनी मन आपुले । सांडी बा अज्ञान ॥१३८९॥
आशा कारण दु:खास । आणि निंदा पातकास । जैसे दुर्भाग्य दारिद्र्यास । कारण अर्जुना ॥१३९०॥
तैसे स्वर्गनरक सूचक । अज्ञान व्याले धर्मादिक । ते सांडावे सकळीक । अर्जुना तू ॥१३९१॥
जैसे आकळता तो दोर । संपे सर्पाभासाचा प्रकार । तैसे होता ब्रह्माकार । विरे अज्ञान ॥१३९२॥
कावीळ ती बरी होणं । मग संपे पिवळेपणाचं भासणं । वा सरे मुखाचे कडवटपण । सरता व्याधी ॥१३९३॥
जैसे सूर्य तो मावळता । होते मृगजळाची सांगता । तैसे अज्ञान ते संपता । संपे आभास ॥१३९४॥
जगी धर्माधर्माचे टवाळ । जे अज्ञानाचेच मूळ । टाक त्यजुनी अर्जुना सकळ । ते धर्मजात ॥१३९५॥
मग अज्ञान ते संपता । उरे केवळ ब्रह्ममयता । जैसे निद्रा ती संपता । घडे जागरण ॥१३९६॥
तैसे मजवाचून काही । येथे कोणी अन्य नाही । या विश्वाच्या ठायी । ब्रह्मचि सारे ॥१३९७॥
ऐसे ते भेदावीण । जाणणे ते एकपण । तयाचेच नाव शरण । जाण तू ॥१३९८॥
जसे घटाचा नाश होता । गगनाची गगनाशी एकता । तैसी मजसी एकरूपता । ज्ञान आहे ॥१३९९॥
सुवर्णमणी सोनिया । तरंग जैसा पाणिया । तैसा मज धनंजया । शरण ये तू ॥१४००॥
समुद्राग्नीने समुद्रा शरण येणे । आणि समुद्रच जाळून टाकणे । ऐसे ते घडणे । अपेक्षित नाही ॥१४०१॥
मजसी एकरूप व्हावे । आणि जीवत्वेही उरावे । ऐसे बोलणे ते आघवे । हास्यापद की ॥१४०२॥
जसे एखाद्या धनवानाने । गरीब स्त्रीशी लग्न करणे । मग ती ही धनवान होणे । तैसे अर्जुना ॥१४०३॥
बा मी विश्वात्मक तो भेटे । आणि जीवग्रंथी न सुटे । हे बोलणे अर्जुना खोटे । वायाच की ॥१४०४॥
म्हणोनि मी होऊनी माते । सेवणे आहे आयते । अर्जुना ऐसे घडता येते । ज्ञान बा हाती ॥१४०५॥
ताकातून लोणी काढता । नच मिसळते मिसळू जाता । तैसी मजसी एकरूपता । न खुंटे कधी ॥१४०६॥
तैसे अद्वैते मज । शरण आल्या तुज । धर्माधर्म हे सहज । लागतीच ना ॥१४०७॥
लोह जातसे गंजून । पण परिसाच्या स्पर्शानं । जाता ते सोने होऊन । न गंजेच की ॥१४०८॥
जसे लाकडाच्या घर्षणानं । होते अग्नीचे प्रज्वलन । मग काष्ठाचंही जळणं । न चुकेच की ॥१४०९॥
अर्जुना काय दिनकर । जाणतो का कधी अंधार । की जागेपणी होय गोचर । स्वप्न कधी ॥१४१०॥
तैसे मजसी एक होता । संपे द्वैताची ती कथा । आणि काही करण्याची आवश्यकता । उरेचिना ॥१४११॥
म्हणून तयाचे ठायी । चिंता न उरे काही । तयाचे पापपुण्य वाही । मीच अर्जुना ॥१४१२॥
राहणे मजहून भिन्नपणे । अर्जुना तेच पाप असणे । होई द्वैताचे संपणे । अद्वैत जाणता ॥१४१३॥
मीठ पाण्यात पडता । पाणीच होते तत्त्वत: । तैसे ब्रह्ममय होता । मीचि होसी ॥१४१४॥
मजसी एक होता । सुटशील अर्जुना आयता । मजसी ती एकरूपता । मोक्षदायी ॥१४१५॥
ऐसे त्या भगवंतानं । सांगितलं अर्जुना समजावून । ब्रह्मी एकरूप होणं । सूत्र आहे ॥१४१६॥
ऐसे सर्वज्ञ जे भगवान । ते म्हणाले श्रीकृष्ण । तयानी दिले होते वचन । ज्ञानाचे ॥१४१७॥
मग सारून ते कंकण । नि बाहु उजवा पसरून । दिले अर्जुना आलिंगन । भगवंताने ॥१४१८॥
जे शब्दी नाही येत । आणि बुद्धीला नाही समजत । ऐसे रहस्यमय तत्त्व । ब्रह्म ते ॥१४१९॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे ते आत्मतत्त्व । अर्जुना भेट ते देत । आलिंगनाचे बा निमित्त । देवाने केले ॥१४२०॥
हृदया हृदय एक झाले । ये हृदयीचे ते हृदयी घातले । द्वैत न मोडता केले । आपणाऐसे ॥१४२१॥
दीपे दीप लावला । तैसा अर्जुना आलिंगला । द्वैत न मोडता केला । आपणा जैसा ॥१४२२॥
तेव्हा सुखाचा मग तया । पूर आला धनंजया । तेथे देवही बुडोनिया । ठेला की ॥१४२३॥
सिंधू सिंधूसी भेटता । अर्जुना पाणी ते दुणावता । तरी तयांची ती एकता । न भंगे कधी ॥१४२४॥
तैसे तया दोघांचे मिळणे । जे द्वैतभावाचे मिटणे । किंबहुना बा नारायणे । कोंदले विश्व ॥१४२५॥
ऐसे वेदांचे मूळसूत्र । सर्व शास्त्रात जे पवित्र । श्रीकृष्णे ते गीताशास्त्र । प्रकट केले ॥१४२६॥
गीतेचे मूळ वेद । कैसा होतो तो बोध । कैसा जाई प्रमाद । चर्चा गीतेमाजी ॥१४२७॥
तरी जयाच्या नि:श्वासी । जन्मा आल्या वेदराशी । तो सत्यप्रतिज्ञ पैजेसी । बोलला स्वमुखे ॥१४२८॥
म्हणोनी वेदा मूळभूत । गीता म्हणो ये उचित । आणिकही एक येथ । उपपत्ति असे ॥१४२९॥
जे कधीच नष्ट नसे होत । जयात सर्व विस्तार असे लपत । तयालाच बा म्हणतात । बीज अर्जुना ॥१४३०॥
गीता वेदांचे बीज । गीतेमाजी आत्मज्ञान सहज । म्हणून गीता ती मज । आवडे बहू ॥१४३१॥
गीता ती आकळता । प्रकटते बा ब्रह्ममयता । मोक्षाची ती वार्ता । गीतेमाजी ॥१४३२॥
जे वेदांचे तिन्ही भाग । गीतेत उमटले असती चांग । भूषणरत्नी सर्वांग । शोभले जैसे ॥१४३३॥
तेथे कर्मादिके तिन्ही । कांड कोणेकोणे स्थानी । गीतेत असती लपुनी । ऐकावे ॥१४३४॥
तरी पहिला जो अध्यावो । तो शास्त्र प्रवृत्ती प्रस्तावो । द्वितीयी सांख्यसद्भावो । प्रकाशिला ॥१४३५॥
मोक्षदायी जे स्वतंत्र । ज्ञान प्रधान हे शास्त्र । दुसऱ्या अध्यायी सूत्र । समजावले आहे ॥१४३६॥
मग अज्ञाने बांधलेया । मोक्षपदी बैसावया । कर्मयोग तो तृतीया । वर्णिला आहे ॥१४३७॥
निष्काम करून मन । अर्जुना कर्म करणं । आहे तेथे मोक्ष प्रकटन । अनायासे ॥१४३८॥
ऐसेनि सद्भावे कर्म करावे । हे तिसऱ्यात आघवे । वर्णिले ते जाणावे । कर्मकांड येथे ॥१४३९॥
कर्मे जी नित्यादिक । कैसी होती बा मोचक । तरी करावी आवश्यक । सांगितली आहेत ॥१४४०॥
पूर्णता होता साधनेची । इच्छा प्रकटता मोक्षाची । क्रिया ब्रह्मार्पणाची । सांगितली आहे ॥१४४१॥
देह वाचा मानसे । संस्काराकारणे निपजे जे जैसे । ते ईश्वरा अनायासे । करावे अर्पण ॥१४४२॥
हेच ईश्वरे कर्मयोगे । चौथ्याच्या शेषभागे । वर्णिले आहे अवघे । भगवंताने ॥१४४३॥
देवताकांडी अकराव्यापर्यंत । होतो कर्माद्वारेच ईश्वर प्राप्त । हेच अर्जुना साद्यंत । सांगितले आहे ॥१४४४॥
ऐसे आठ ते अकरा । वर्णिले कर्माच्याच प्रकारा । तेव्हाच एकरूपता ईश्वरा । शक्य होते ॥१४४५॥
त्या ईश्वरकृपेकारणे । श्री गुरूंचे ते भेटणे । आणि सत्यज्ञानाचे प्रकटणे । होते मग ॥१४४६॥
सर्व सात्त्विक गुण । अंगी वाढावेत म्हणून । बाराव्याचे ते आयोजन । केले आहे ॥१४४७॥
मग त्या बाराव्यापासून । बा पंधराव्यापर्यंत ज्ञान । संपूर्ण पुन्हा विस्तारून । सांगितले आहे ॥१४४८॥
या चार अध्यायात । संपूर्ण ज्ञानाची बरसात । पुन: पुन्हा असे वर्षत । करुणाच ती ॥१४४९॥
ऐसे कांडत्रयाचे निरूपण । केले आहे भगवंतानं । गीतेच्या त्या निमित्तानं । राया माझ्या ॥१४५०॥
हे सर्व आयोजन । एका मोक्षाच्याच कारण । पुन: पुन्हा भगवंतानं । केले आहे ॥१४५१॥
ज्ञानाशी वैर धरून । जे असे बा अज्ञान । त्या अज्ञानाचं वर्णन । सोळाव्यात आहे ॥१४५२॥
शास्त्राचे सहाय्य घेऊन । बदलावे ते आचरण । ऐसे अवगुणा जिंकणं । सतरावा आहे ॥१४५३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे पहिल्या अध्यायापासून । त्या सतराव्या लागून । वेद स्पष्ट करून । सांगितला आहे ॥१४५४॥

पहिल्या सतराचा आढावा । ज्या एकात आघवा । तो अध्याय अठरावा । कळस आहे ॥१४५५॥

ऐसे अध्यात्मिक ज्ञान । गीते माजी महान । मोक्षाचं ते लाभणं । तेथे अर्जुना ॥१४५६॥

वेदाठायी एक उणं । तयाने स्त्रीशूद्रादिका डावलून । पहिल्या तिघांसाठी ज्ञान । सांगितले आहे ॥१४५७॥

स्त्रीशूद्रा डावलणं । अयोग्य आहे म्हणून । हे गीतेचे प्रकटन । भगवंताने केले ॥१४५८॥

ऐसे मागील ते उणे । फेडावया गीतापणे । अर्जुनाच्या त्या निमित्ताने । प्रकटले येथे ॥१४५९॥

श्रवण वाचन करून । होता गीतेचे आकलन । जिवाचे ते कल्याण । नक्कीच आहे ॥१४६०॥

गीता ती वाचणे । गीतेचा अभ्यास करणे । गीतेचे मनन होणे । कल्याणदायी ॥१४६१॥

स्त्रीशूद्रांसकट । कोणीही वाचता सरलाट । मोक्षच होत असे प्रकट । आकळता मनी ॥१४६२॥

आकाशा वसावया । पृथ्वीवरी बैसावया । प्रकाशा त्या रहाटावया । आधार नभ ॥१४६३॥

तैसे उत्तम अधम न पाहून । दिले बा अध्यात्म ज्ञान । गीतेच्या त्या निमित्तानं । भगवंताने येथे ॥१४६४॥

मागील निंदेला ते भिऊन । आता वेद गीतेच्या रूपानं । सर्वांना बरोबर घेऊन । निघाला आहे ॥१४६५॥

ऐसे सर्वांना घेऊन बरोबर । वेदाने उघडले ज्ञानद्वार । भगवंताचे ते उपकार । आम्हावरी अर्जुना ॥१४६६॥

जैसे वासराच्या निमित्तानं । सर्व घराला दूध लाभणं । तैसे पांडवांच्या निमित्तानं । उध्दरले जग ॥१४६७॥

चातकाची दया येऊन । मेघानं ते जोरात बरसणं । आणि चराचराचे कल्याण । होते बा अर्जुना ॥१४६८॥

जसा त्या कमळाच्या कारण । सूर्य उदयाला येणं । आणि सर्व विश्वाचं कल्याण । होतसे तेथे ॥१४६९॥

तैसे अर्जुनाचेनि व्याजे । गीता प्रकाशूनी श्रीराजे । संसाराएवढे थोर ओझे । फेडिले जगाचे ॥१४७०॥

सर्व शास्त्रांचे ज्ञान । दिले विश्वा समजावून । जयाच्याकारण कल्याण । सर्वांचे राया ॥१४७१॥

बा कुळ ते पवित्र । जेथीचा पार्थु ज्ञाना पात्र । म्हणून प्राप्त ते गीताशास्त्र । जगाला अवघ्या ॥१४७२॥

हे असो मग तेणे । सद्‌गुरु श्रीकृष्णे । पार्थाचे ते मिसळणे । आणले द्वैता ॥१४७३॥

पाठी म्हणतसे पांडवा । शास्त्र का आवडले तुवा । येथे अर्जुन म्हणे देवा । कृपा तुझी ॥१४७४॥

धन ते जोडावया । भाग्य लागे धनंजया । आणि जोडिले भोगावया । विरळ्यासी मिळे ॥१४७५॥

अर्जुना त्या असुरांनी । अमृत काढिले समुद्र मंथुनी । पण भोगण्याच्या क्षणी । नव्हते भाग्य ॥१४७६॥

ते प्रयत्न फळा आले । अमृतही डोळा देखिले । पण प्राप्तीस ते चुकले । अमृताच्या अर्जुना ॥१४७७॥

अमृत ते पिऊन । अमर होऊन जाणं । पण गेले ते मरून । दुर्भाग्याकारणे ॥१४७८॥

नहुष स्वर्गस्वामी झाला । पण आचरणी घसरला । म्हणून सर्पयोनीत जन्मला । जाणतोस तू ॥१४७९॥

म्हणोनी बहुत पुण्य तुवा । केले बा धनंजया । म्हणून शास्त्र राजा इया । भेट झाली ॥१४८०॥

म्हणून जे शास्त्रोक्त । कर्म उचित आचरत । तू ज्ञानवान होत । व्हावेस मुक्त ॥१४८१॥

मन निष्काम न होता । सार मनी न समजता । सर्व साधनांची व्यर्थता । समजो तुला ॥१४८२॥

गाय चांगल्या जातीची । न जाणता कला पिळण्याची । काय ती कधी कामाची । असे का अर्जुना ॥१४८३॥

श्रीगुरू प्रसन्न झाले । तयांनी ज्ञान सांगितले । आणि जर मन निष्काम न झाले । मग व्यर्थ सारे ॥१४८४॥

म्हणून मनाची निष्कामता । तीच धर्माची रहस्यता । निष्कामता प्राप्त होता । मुक्ती आहे ॥१४८५॥

तुवा हे जे पार्था । गीताशास्त्र लाभले सर्वथा । जया नसे बा आस्था । न सांगावे तया ॥१४८६॥

साधनेत जो प्रवीण । पण मोक्षाच्या ओढीवीण । तयासीही गीता सांगणं । टाळावे अर्जुना ॥१४८७॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधु नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाऱ्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पाडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे ह्रदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान®

www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळ्यांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०